आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.०० वाजता
११ मे २०२५ - रविवार

**ठळक बातम्या**

- पहलगाम हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरची शस्त्रसंधी या मुद्द्यांवर संसदेचं विशेष अधिवेशन बोलवायची विरोधकांची मागणी

- मालवणजवळ राजकोट इथं उभारलेल्या छत्रपती शिवाजीमहाराजांच्या पुतळ्याचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पूजन

- चीनमध्ये शांघाय इथं आयोजित तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत पार्थ साळुंखेला कांस्यपदकाची कमाई

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, एकदिवसीय तिरंगी मालिकेत अंतिम सामन्यात श्रीलंकेवर ९७ धावांनी मात करत भारतानं करंडक पटकावला

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ला, ऑपरेशन सिंदूर आणि त्यानंतरचा युद्धविराम या मुद्द्यांवर संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्याची मागणी विरोधकांनी केली आहे.

काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेतले विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी तसं पत्र प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना लिहीलं आहे. या मुद्यांवर व्यापक चर्चा होणं आवश्यक असल्याचं मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी व्यक्त केलं आहे. भारत पाकिस्तान दरम्यान शस्त्रसंधीची घोषणा सर्वप्रथम अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी समाजमाध्यमांवर केली, तसंच अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी तटस्थ मंचाचा उल्लेख केला, या विषयी त्यांनी आक्षेप घेतला असून सिमला करार डावलला तर जात नाही ना? असा प्रश्न उपस्थित केला आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानबरोबर शस्त्रसंधी जाहीर केल्यानंतर आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतल्या निवासस्थानी महत्त्वाची बैठक घेतली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग तसंच तिन्ही सेनादलांचे प्रमुख बैठकीला उपस्थित होते.

भारतीय हवाई दलानं ऑपरेशन सिंदूरमधे सोपवलेली कामगिरी सफाईनं आणि नेमकेपणाने राष्ट्रीय उद्दिष्टांनुसार पूर्ण केली आहे. अद्याप ही कारवाई सुरु असल्यानं त्याबाबतची तपशीलवार माहिती यथावकाश प्रसिद्ध केली जाईल असं भारतीय हवाईदलाच्या सूत्रांनी सांगितलं. यासंदर्भात अधिक तर्क लढवू नये तसंच अफवांवर विश्वास ठेवू नये असं हवाईदलानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

भारतानं ऑपरेशन सिंदूर अंतर्गत केलेली कारवाई म्हणजे भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक इच्छाशक्तीचं तसंच आणि लष्करी सामर्थ्य आणि निर्धारचं प्रतिक आहे असं केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. राजनाथ सिंह यांनी आज दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून लखनऊ इथल्या ब्राम्होस एकात्मिकरण आणि चाचणी सुविधा केंद्राचं उद्घाटन केलं. त्यावेळी ते बोलत होते. हा प्रकल्प म्हणजे भारतानं संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेनं टाकलेलं मोठं पाऊल आहे आणि यामुळे भारताची ताकद वाढेल असं ते म्हणाले. ब्रह्मोस हे केवळ शस्त्र नाही तर ते, शत्रूला भारतीय सशस्त्र दलांच्या सामर्थ्याचा इशारा देणारं आणि सीमांचं रक्षण करण्याच्या वचनबद्धतेचा संदेश आहे असं त्यांनी सांगितलं.

या सुविधा केंद्रासोबतच खाजगी सार्वजनिक क्षेत्राच्या भागिदारीअंतर्गत लखनऊमध्ये पीटीसी इंडस्ट्रीज लिमिटेडद्वारे टायटॅनियम आणि सुपर-अलॉय धातू निर्मिती प्रकल्प सुरु केला जात असल्याचं, तसंच आणखी ७ महत्त्वाच्या प्रकल्पांची पायाभरणीही केली जात असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारत पाकिस्तान दरम्यान तणाव असताना युद्धाच्या व्हिडीओ गेमच्या चित्रफिती भारत-पाकिस्तान संघर्षाच्या खऱ्या चित्रफिती म्हणून प्रसारित केल्या जात आहेत. अशा बनावट संदेशांपासून सावध रहावं तसंच ते पुढे प्रसारित करु नये, असं आवाहन पत्र सूचना कार्यालयानं केलं आहे. संरक्षण विभागाच्या कार्यालयाच्या नावानं समाजमाध्यमांवर फिरणारा इशारावजा संदेश खोटा असल्याचं  कार्यालयानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

आज राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन आहे. १९९८ मध्ये आजच्याच दिवशी भारतानं राजस्थानात पोखरण इथं यशस्वी अणुचाचणी केली. या दिवशी देशाच्या प्रगती आणि विकासात तंत्रज्ञानाच्या महत्त्वाच्या भूमिकेचं स्मरण केलं जातं. पहिलं स्वदेशी विमान हंस-३ च्या प्रक्षेपणात आणि सहाव्या जागतिक अणुचाचणीत शास्त्रज्ञ, अभियंते आणि नवोन्मेषकांच्या योगदानाच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण इथे राजकोट किल्ल्यावर उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी पूजन केलं. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार नारायण राणे, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या पुतळ्याचा परिसर लवकरच योग्य प्रकारे विकसित केला जाईल, असं फडनवीस यांनी या सोहळ्यानंतर सांगितलं. कोकण किनारपट्टीवर येणाऱ्या विविध वादळांची तीव्रता लक्षात घेऊन या पुतळ्याची रचना करण्यात आली आहे. याबाबत आमच्या वार्ताहरानं माहिती दिली….

**होल्ड - व्हॉईस कास्ट- निलेश कुलकर्णी (३५ सेकंद)**

<><><><>

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आघाडी कायम ठेवत ७५ पदकांची कमाई केली आहे. यात २८ सुवर्ण, २२ रौप्य आणि २५ कास्य पदकांचा समावेश आहे. त्यातही सर्वाधिक २९ पदकं पोहण्याच्या स्पर्धेत मिळाली असून त्यात ७ सुवर्ण पदकांचा समावेश आहे. त्याखालोखाल तिरंदाजी, नेमबाजी, सायकलिंक, भारोत्तोलन, मल्लखांब, टेबलटेनिस आणि खो-खो या खेळांचा समावेश आहे. महाराष्ट्राखालोखाल १४ सुवर्ण पदकांसह ३९ पदकं मिळवून कर्नाटक दुसऱ्या स्थानावर तर राजस्थान २३ पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

<><><><>

चीनमध्ये शांघाय इथं आयोजित तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत तिरंदाज दीपिका कुमारी आणि पार्थ साळुंखे यांनी कांस्यपदकाची कमाई केली. दीपिकाने टोकियो ऑलिंपिक संघाच्या सुवर्णपदक विजेत्या कोरियाच्या कांग चाययुंगचा ७-३ असा पराभव केला. तर पार्थ साळुंखे याने पॅरिस ऑलिंपिक पदक विजेत्या फ्रान्सच्या बॅप्टिस्ट एडिसचा ६-४ असा पराभव केला. शांघाय तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारताने दोन सुवर्ण, १ रौप्य आणि ४ कांस्य पदकांसह एकूण सात पदकांची कमाई केली आहे.

<><><><>

महिला क्रिकेटमधे, एकदिवसीय तिरंगी मालिकेत आज कोलंबो इथं झालेल्या अंतिम सामन्यात भारतानं श्रीलंकेवर ९७ धावांनी मात केली आणि करंडक पटकावला.

भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित ५० षटकात ७ गड्यांच्या मोबदल्यात ३४२ धावा केल्या. त्यात स्मृती मंधानानं १०१ चेंडूत ११६ धावा करून मोलाचं योगदान दिलं. एकदिवसीय क्रिकेटमधलं तिचं हे अकरावं शतक होतं. एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक शतकं

करणारी ती तिसरी महिला क्रिकेटपटू ठरली आहे. स्मृती या सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव सामन्यातले १० चेंडू बाकी असतानाच २४५ धावांवर आटोपला.

भारतातर्फे स्नेह राणानं ४, तर अमनज्योत कौरनं ३ बळी मिळवले. या मालिकेत एकूण १५ बळी मिळवत स्नेह राणा मालिकेतली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली.

**<><><><><>**

राज्यात यंदा अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन आणि केंद्रीय पद्धतीनं होणार आहे. येत्या ११ ऑगस्टपासून महाविद्यालयं सुरू होणार असून, १५ ऑगस्टपर्यंत प्रवेशाचे सर्व टप्पे पूर्ण केले जातील, अशी माहिती माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक संपत सूर्यवंशी यांनी दिली. या प्रक्रियेदरम्यान पालक किंवा विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून खबरदारी घेतली जात आहे.

राज्य सरकारने mahafyjcadmissions.in हे संकेतस्थळ आणि ८५३०९५५५६४ हा मदत दूरध्वनी क्रमांक दिला आहे.

**<><><><><>**

भगवान गौतम बुद्धांनी जगाला दिलेला अहिंसा आणि विश्वशांतीचा विचार जगाला तारणारा आहे; वैज्ञानिक दृष्टीकोन देणारा आहे. विश्वशांतीचा हा विचार भगवान बुद्धांनी भारतातून जगाला शिकवला याचा आम्हाला अभिमान आहे, असं प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज केलं. आठवले हे बुद्ध जयंतीच्या पार्श्वभूमीवर तीन बौद्ध राष्ट्रांच्या दौऱ्यावर आहेत. कंबोडिया इथल्या दौऱ्यानंतर बुद्धपौर्णिमेनिमित्त त्यांनी सर्व भारतीयांना शुभेच्छा दिल्या, त्यावेळी ते बोलत होते.

दरम्यान, उदया १२ मे रोजी बुद्ध पौर्णिमेच्या निमित्तानं होणाऱ्या मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्रात वन्यप्राणी प्रगणनेसाठी तयारी पूर्ण झाली आहे. यामध्ये निसर्गप्रेमींसाठी निसगार्नुभव कार्यक्रम राबवला जाणार असून या कार्यक्रमाकरता मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या संकेतस्थळावर ३१० निसर्ग प्रेमींनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी १९७ निसर्ग प्रेमींचे अर्ज मंजूर झाले आहेत. मेळघाटातल्या गुगामल व्याघ्र प्रकल्पासाठी ३६, अकोटसाठी ५६, अकोला, काटेपूर्णा, नैनंगाकरता २३, तर, टिपेश्वर, पैनगंगा रेंजच्या जंगलात ४७ निसर्गप्रेमींना मचाणांवरून वन्य प्राण्यांना पाहता येणार आहे. याकरता उभारलेल्या प्रत्येक मचाणांवर प्रत्येक निसर्गप्रमीसोबत एक गाईड किंवा वन कर्मचारी राहणार आहे.

**<><><><><>**

सातारा जिल्ह्यात फलटणजवळ सालपे इथं आज पहाटे एका खासगी प्रवासी बसची ट्रकसोबत धडक होऊन झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू झाला, तर आठ जण जखमी झाले. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

उज्जैन इथं निघालेली खासगी प्रवासी बस  आज पहाटे अडीचच्या सुमाराला सालपे घाट उतरल्यावर समोरून येणाऱ्या ट्रकवर धडकली.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात काही ठिकाणी, तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात लक्षणीय घट झाली, मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी किंचित घट झाली. राज्याच्या चारही विभागांमध्ये आठवडाभर तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. पुढचे चार दिवस तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट, आणि मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**